# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, ता.जि. ठाणे
फो.नं. ०२२-२९४५१००१
E-mail : pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्र. १८१/२०२३

## प्रेस नोट

## मजुरीच्या मोबदल्याच्या वादातुन मालकाची हत्या करुन पसार झालेला आरोपी १२ तासांचे आत जेरबंद करण्यात माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण पथकास यश

दिनांक ०३/०६/२०२३ रोजी रात्री २०.०० वा. चे सुमारास दिवाणमान, वसई पश्चिम येथील कासा टेरेजा या बिल्डींग बांधकामाचे साईडवरील पत्र्याचे शेड मध्ये राहणारे मो. मोईन व मो. अरबाज आलम, दोघेही रा. जि. कटीहार, राज्य बिहार यांचेमध्ये मजुरीचा मोबदला देण्यावरुन झालेल्या वादातुन रागाचे भरात मो. अरबाज आलम याने मो. मोईन याचे डोक्यावर, चेहऱ्यावर व गळ्यावर लाकडी फळीने मारहाण करुन, गंभीर दुखापत करुन त्यास जिवे ठार मारले म्हणुन मयताचा भाऊ फिर्यादी नामे मो. आवेश मो. फारुख, वय ३५ वर्षे, व्यवसाय – सेट्रींग वर्क, रा. एल.टी. मार्ग, बोरीवली पश्चिम, मुंबई मुळ रा. कटिहार, राज्य बिहार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन माणिकपुर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २१०/२०२३ कलम ३०२,५०४,५०६ भा.दं.वि. दिनांक ०४/०६/२०२३ रोजी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयातील आरोपी नामे मो. अरबाज मो. मिराज आलम याचे मित्र, मुळगाव, नातेवाईक, इत्यादीबाबत कोणतीही माहीती उपलब्ध नसल्याने खुनासारख्या गंभीर गुन्हयातील आरोपीचा शोध घेणे माणिकपुर पोलीसांसमोर मोठे आव्हान होते. सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन मा. वरीष्ठांच्या मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे माणिकपुर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषणाद्वारे व बौध्दीक कौशल्याचे आधारे आरोपी नामे मो. अरबाज मो. मिराज आलम, वय २५ वर्षे, रा. ग्राम बारसोई, मोलनापुर, देवगण मस्जिदजवळ, महानंदा नदीच्या बाजुला, थाना बारसोई, जि. कटीहार, राज्य बिहार यास पळुन जाण्याच्या तयारीत असताना लोकमान्य टिळक टर्मिनल, कुर्ला, मुंबई येथुन शिताफीने ताब्यात घेवुन १२ तासांचे आत गुन्हा उघडकीस आणला आहे. त्याच्याकडे केलेल्या चौकशीमध्ये त्याने मजुरीचा मोबदला देण्यावरुन झालेल्या वादातुन रागाचे भरात मालकाच्या डोक्यात लाकडी फळीने मारुन खुन केल्याची कबुली दिली आहे.

सदर कारवाई श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२, श्रीमती पद्मजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग व श्री. संपतराव पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. अभिजीत मडके (गुन्हे), पो.नि. अशोक कांबळे (प्रशासन), गुन्हे प्रकटीकरण अधिकारी स.पो.नि. सचिन सानप, पो.उ.नि. तुकाराम भोपळे, पो.ह. शैलेश पाटील, पो.ह. अनिल चव्हाण पो.ह. धनंजय चौधरी, पो.शि. प्रविण कांदे यांनी केली आहे.